**मेसर्स मॉयल लिमिटेड, मनसर, चारगांव, खैरी, परसोडा, कांद्री, तालुका-रामटेक, जिल्हा नागपूर येथील लिज क्षेत्र १९३.२७ हेक्टर क्षेत्रफळात खाण पध्दतीचा वापर करून त्यांची उत्पादन क्षमता ८९९९२ टन प्रतीवर्ष वरून २,८०,००० टन प्रतीवर्ष पर्यंत विस्तारीकरण उत्पादन घेण्यासाठी प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत....**

---

मेसर्स मॉयल लिमिटेड, मनसर, चारगांव, खैरी, परसोडा, कांद्री, तालुका-रामटेक, जिल्हा नागपूर येथील लिज क्षेत्र १९३.२७ हेक्टर क्षेत्रफळात खाण पध्दतीचा वापर करून त्यांची उत्पादन क्षमता ८९९९२ टन प्रतीवर्ष वरून २,८०,००० टन प्रतीवर्ष पर्यंत विस्तारीकरण उत्पादन घेण्यासाठी प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि. १२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता मौजा- प्रकल्पाचे स्थळ मे.मनसर मॅगनिज भूमितगत खाण, मनसर, ता.रामटेक, जि. नागपुर येथे संपन्न झाली.

पर्यावरण आघात मुल्याकंन, अधिसुचना दि. १४ सप्टेबर २००६ व २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार जाहिर लोकसुनावणीचे स्थळ, दिंनाक व वेळ, मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांची मंजुरी घेऊन निश्चित करण्यात आली होती.

मंडळाचे मुख्यालयाने पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-२४१२०९-FTS-०१११ दि. ०९/१२/२०२४ अन्वये सदर जाहिर लोकसुनावणी दि. १२/१२/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थळी घेण्याबाबत कार्यालयीन आदेश जारी केला. **(सहपत्र-१)**

या प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीच्या सुचना मराठी वृत्तपत्र दैनिक लोकमत व इंग्रजी दैनिक वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया मध्ये दि. ११ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रसिध्दी करण्यात आली होती. **(प्रत सोबत-२)**

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीकरीता मा. अनुप खांडे, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक लोकसुनावणी समिती, सौ. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर तथा सदस्या पर्यावरण विषयक लोकसुनावणी समिती, श्री. राजेंद्र उ पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र.नि. मंडळ, नागपुर तथा समन्वयक लोक सुनावणी समिती, ग्रामस्थ, सरपंच, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावि संस्था, चॅनलचे प्रतिनिधी, व मोठया संख्येने स्थानिक उपस्थित होते. या बाबतचे हजेरी पट सोबत जोडत आहे. **(सहपत्र-३)**

**<u>कार्यपध्दती व उद्देश :</u>**

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सर्वप्रथम श्री. राजेंद्र उ. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले ग्रामस्थ, स्थानिक, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावि संस्था, वर्तमानपत्राचे प्रतिनिधी यांचे हार्दिक स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची प्रक्रिया सुरु केली. समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार सदरील लोकजाहीर सुनावणी जनतेच्या माहितीसाठी लोकसुनावणी प्रसिध्दी सुचना दोन वृत्तपत्र जसे मराठी वृत्तपत्र दैनिक लोकमत व इंग्रजी दैनिक

वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया ३० दिवस आधी दि ११ नोव्हेंबर २०२४ रोजी प्रसिध्दी करण्यात आली होती. त्यामध्ये प्रस्तावित प्रकल्पाविषयी सुचना,विचार टिका टिप्पणी, आक्षेप, तोंडी तसेच लेखी स्वरुपात नोंदविण्याचे जनतेला व पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्थांना आवाहन करण्यात आलेले होते.

तसेच प्रस्तावित मेसर्स मॉयल लिमिटेड, मनसर, चारगांव, खैरी, परसोडा, कांद्री, तालुका-रामटेक, जिल्हा नागपूर येथील लिज क्षेत्र १९३.२७ हेक्टर क्षेत्रफळात खाण पध्दतीचा वापर करून त्यांची उत्पादन क्षमता ८९९९२ टन प्रतीवर्ष वरून २,८०,००० टन प्रतीवर्ष पर्यंत विस्तारीकरण उत्पादन घेण्यासाठी प्रस्तावित प्रकल्पासंबंधी पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडाचा मसुदा, कार्यकारी सारांशच्या प्रती जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी स्थानीक मराठी भाषेत व इंग्रजी भाषेत भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार अभ्यासण्याकरीता खालील अधिसूचित स्थानिक कार्यालये व ग्रामपंचायती येथे उपलब्ध करण्यात आले आहेत.

१.जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
२. जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर
३. जिल्हा परिषद, नागपूर
४. उप-विभागीय अधिकारी, रामटेक, जि.नागपूर
५. तहसिल कार्यालय, रामटेक, ता.रामटेक, जि.नागपूर
६. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ५ वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
७. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. मप्रनि मंडळ (मुख्यालय), सायन सर्कल, सायन (पुर्व), मुंबई-२२.
९. मुख्याधिकारी, नगर परिषद, रामटेक, जि.नागपूर.
१०. ग्रामपंचायत कार्यालय, मनसर, ता.रामटेक, जि.नागपूर
११. ग्रामपंचायत कार्यालय, चारगांव, ता.रामटेक, जि.नागपूर
१२. ग्रामपंचायत कार्यालय, खैरी, ता.रामटेक, जि.नागपूर
१३. ग्रामपंचायत कार्यालय, परसोडा, ता.रामटेक, जि.नागपूर
१४. ग्रामपंचायत कार्यालय, कांद्री, ता.रामटेक, जि.नागपूर

वरील नमुद अधिसुचित शासनाच्या विभागाला देखील त्यांनी त्याच्या स्तरावर सदरहु पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची बाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अश्या प्रकारे जाहीर जनसुनावणी बाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी ३० दिवस आधी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्प बाधित किंवा संबंधित व्यक्तींना प्रकल्पाविषयी सूचना,विचार, टिका, टिप्पणी व आक्षेप तोंडी तसेच लेखी स्वरूपात नोंदविणे सोयीचे होईल.

सदरहु जाहिर लोकसुनावणीच्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म. प्र. नि. मंडळ, नागपुर-१ यांना लेखी ०२ सुचना प्राप्त (प्रत सोबत) झाल्या तथा इमेलद्वारे कुठलेही सुचना/हरकत प्राप्त झालेली नाही.

सदरील समिती ही फक्त लोकांचे सदरील प्रकल्पाबाबतचे मत नोंदविण्याकरीता असुन कोणालाही निर्णय घेण्याचा अधिकार या समितीस नाही. जनसुनावणीमध्ये उपस्थित मुददयांचा व प्रकल्प धारकांनी दिलेल्या उत्तरास अनुसरुन बैठकिचे इतिवृत्त राज्यस्तरीय आघात मुल्यांकन प्राधिकरण समितीकडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई यांच्या मार्फत सादर करण्यात येईल.

सदरील प्रकल्पाविषयाबाबत आव्हान करण्यात येते की, ज्या कोणालाही लेखी निवेदन/सुचना /हरकती ध्यावयाचे असल्यास त्यांनी प्रकल्प धारकांचे सादरीकरण केल्यानंतर आपले नाव, गावाचे नाव सांगुन प्रश्न, सुचना,

हरकती, विचारु शकताता या प्रश्न उत्तराच्या कार्यवाहीची नोंद जशीच्या तशी घेऊन या जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त राज्यस्तरीय आघात मुल्यांकन प्राधिकरण समिती कडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई यांच्या मार्फत पाठविण्यात येईल. त्यावर तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेतील.

समन्वयक, यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत प्रकल्पा संबंधिची पर्यावरण अनुमतीच्या प्रस्तावाकरीता पर्यावरण विषयक लोकजाहीर सुनावणीची सादरीकरण करण्याची सुचना केली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पा विषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रमुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

**प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती**

- नॅबेटद्वारा मान्यता प्रमाणपत्र
- प्रकल्प प्रोफाईल व मुख्य वैशिष्टे
- स्थान नकाशा
- गुगल नकाशा
- स्थानिक भू-शास्त्र
- स्ट्रॅटी ग्राफीक उत्तराधिकार
- खनिज उपलब्धता आणि अपेक्षित खाण अस्तित्व
- उपलब्ध राखीव आणि खाण कालावधी
- खाण क्षेत्रातील छायाचित्र
- खाण पध्दत
- खाण लिज क्षेत्राचा जमीन वापर
- अभ्यास क्षेत्रासाठी जमीन वापर/जमीन आवरण मॅप पॅर्टन
- मेट्रो लॉजिकल डाटा
- विंड रोज डायग्राम
- बेसलाईन अभ्यास
- अभ्यास क्षेत्रात ध्वनि प्रदूषण (Unit-dBA)
- भूजल वातावरण
- पाण्याची गरज
- पाण्याचे वातावरण
- माती पर्यावरण
- सामाजिक आर्थिक पर्यावरण
- पर्यावरण व्यवस्थापन योजना अंमलबजावणी
- संक्रीत पर्यावरणीय प्रभाव आणि उपकरणे उपाय
- हरित क्षेत्र विकास
- खाणीतील वनीकरणाची स्थिती
- पर्यावरणीय संरक्षण उपाय योजनांची बजेट
- पर्यावरण देखरेख कार्यक्रम
- प्रकल्प फायदे

प्रकल्पधारकाच्या सादरीकरण झाल्यानंतर मा.समिती अध्यक्ष यांच्या मान्यतेने उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर-१ तथा समन्वयक गठीत लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले प्रतिनीधी यांना सदरील पर्यावरण विषयक जनसुनावणीचे उद्दीष्ट पुर्ण होण्याकरीता आपले मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना/हरकती मांडण्याबाबत आवाहन केले.

**जनसुनावणी नोंद (प्रोसीडींग):**

| अ. क्रं. | उपस्थितांनी उपस्थित केलेले मुद्दे | जनसुनावणी समितीने दिलेली प्रतिक्रिया सुचना | प्रकल्प धारकांनी दिलेली प्रतिक्रिया / उत्तर |
|---|---|---|---|
| १ | डॉ.राजेश ठाकरे, ग्रा.पं.सितलवाडी, परसोडा, ता.रामटेक, जि.नागपूर- यांनी असा मुद्दा उपस्थित केला की,<br>सदर प्रकल्पाची व जनसुनावणीची माहिती जनसामान्यांना देण्यात आली परंतु जनसुनावाणीला उपस्थितांची संख्या कमी असल्याने जनसुनावणीच्या प्रचाराबद्दल केलेल्या प्रश्नाबद्दल स्पष्टीकरण दयावे.<br>• सदर प्रकल्प स्थानिकांच्या हितार्थ आहे व प्रकल्पाने पर्यावरणास हानी होणार नाही याबद्दल दिलेल्या तांत्रिक बाबीबद्दल आमचे सहमत आहे.<br>• प्रकल्पाच्या उत्पादन वृध्दिनंतर वाढलेली कर्मचाऱ्याची संख्या किती असेल व थेट पध्दतीने आणि कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची टक्केवारी किती असेल.<br>• मॅगनीज वरआधारीत प्रक्रिया उद्योग, स्टील प्लांट या क्षेत्रात उभारण्यात यावा जेणेकरून या क्षेत्रातील कच्चा माल येथेच वापरल्या जाईल व क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढतील.<br>• CREP अंतर्गत मनसर क्षेत्रातील गावे व NGO, सामाजिक संस्था यांना विविध कार्यामध्ये आर्थिक सहायता करण्यात यावी.<br>• हा प्रकल्प छान आहे या प्रकल्पाचे मी स्वागत करतो, हा प्रकल्प व्हावा यास माझी सहमती आहे व लागेल ती मदत करण्याचे मी आश्वासन देतो.<br>• या प्रकल्पासाठी भरती होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी स्थानिक लोकांना प्राधान्य असेल का?<br>• मॉयलद्वारे मनसर क्षेत्रात CREP अंतर्गत शाळा सुरू करण्यात यावी. | • जनसुनावणीच्या ३० दिवस आधी मराठी दैनिक वृत्तपत्र लोकमत व टाईम्स ऑफ इंडियामध्ये जनसुनावणी बद्दल जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. तसेच प्रकल्पक्षेत्रातील ग्रामपंचायत येथे पत्राद्वारे कळविण्यात आले होते. | • तसेच दि. ११.११.२०२४.जनसुनावणी बद्दल गावांमध्ये दवंडी करण्यात आली. दवंडी दरम्यान प्रकल्पक्षेत्रांतील गावांमध्ये जनसुनावणी बद्दल माहिती देणारे बॅनर जागोजागी लावण्यात आले व लाऊड स्पिकर ने जनसुनावणी बद्दल नागरीकांना सुचना देण्यात आली. गावात करण्यात आलेल्या मुनादींची व्ही.डी.ओ. ग्राफी व फोटोग्राफी करण्यात आली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला सुपूर्त करण्यात आली.<br>• प्रकल्पाच्या उत्पादन वृध्दिनंतर ३२४ अधिकचे कर्मचारी या प्रकल्पासाठी लागतील. यातील ५० ते ६० कर्मचारी थेट पध्दतीने भरती करण्यात येतील. तसेच उर्वरीत कंत्राटी पध्दतीने शैक्षणिक व तांत्रिक अहर्तनुसार भरती करण्यात येतील.<br>• सरळ भरतीद्वारे केलेल्या भरतीमध्ये स्थानिकांना प्राधान्य नसेल. शैक्षणिक व तांत्रिक अहर्तनुसार भरती करण्यात येतील.<br>• CREP अंतर्गत ठेवण्यात आलेली निवेदने स्थानिक प्रशासन व पंचायत समिती इ. क्षरे पाठवली जावी तरच ती विचाराधीन घेणे शक्य होईल.<br>• CREP अंतर्गत प्रकल्पा नजीकच्या गावांमध्ये पेयजल समस्या व इतरआवश्यक कामे करण्यासाठी गावांना आर्थिक |

| | | | |
|---|---|---|---|
| | • सदर प्रकल्पाची व जनसुनावणीची माहिती जनसामान्यांना देण्यात आली परंतु जनसुनावणीला उपस्थितांची संख्या कमी असल्याने जनसुनावणीच्या प्रचाराबद्दल केलेल्या प्रयत्नांबद्दल स्पष्टीकरण दयावे. | | सहाय्य देण्याचे विचाराधिन आहे.<br>• CREP अंतर्गत मनसर खान परिसरातत केन्द्रीय शिक्षण बोर्ड अभ्यासक्रम असलेली शाळेचे बांधकाम सुरू झाले असून व कोरोना संसर्ग काळात काही तांत्रीक अडचनीमुळे बांधकाम बंद झाले. मॉयल कडुन शाळेचे बांधकाम व शाळा लवकरच सुरू करण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहे. |
| २ | श्री.चंद्रकांत चंदन, ग्राम पटगौरी, ता.रामटेक, जि.नागपूर यांनी उपस्थित केलेला मुद्दा<br>• या क्षेत्रात स्टील उद्योग सुरू करण्यात यावा जेणेकरून रोजगाराच्या संधी वाढतील.<br>• या प्रकल्पाबद्दल श्री ठाकरे यांच्या वक्तव्याशी मी सहमत आहे व या प्रकल्पाला मी माझी सहमती दर्शवतो. | • ही जनसुनावणी पर्यावरण विषयक आहे व उपस्थितांनी प्रकल्पाबद्दल आपले मत, टिका, टिप्पणी, आक्षेप, सूचना / हरकती मांडाव्यात.<br>• प्रश्नांची पुनरावृत्ती उपस्थितांनी टाळावी नवीन प्रश्न असल्याचे विचारावे. | • प्रकल्प धारकांनी या मुद्दयाची नोंद घेतली व आपली सहमती दर्शविली. |
| ३. | श्री. संजय सत्यकार, सामाजिक कार्यकर्ता, कन्हानर, ता.रामटेक, जि.नागपूर यांनी उपस्थित केलेले मुद्दे.<br>• २८०००० टन पर्यंत उत्पादन वृध्दि करण्यासाठी फक्त ६५ कर्मचाऱ्यांची गरज पडेल अशी माहिती देण्यात आली त्याबद्दल स्पष्टीकरण दयावे.<br>• क्षेत्रात प्रक्रिया उद्योग सुरू करण्यात यावा तसेच मॅगनीजचा वापर करून बॅटरी निर्माण उद्योग सुरू करण्यात यावा.<br>• या प्रकल्पासाठी नविन जागा खरेदी करण्यात येईल का?<br>• वन्यजीव व मानसिंगदेव अभयारण्य प्रकल्पाच्या जवळच आहे.<br>• प्रकल्पासाठी पाण्याचा उपसा किती खोलवरून करण्यात येईल व खाणीचे भरणीकरण कसे करण्यात येईल.<br>• खाणीसाठी उपसा केलेले पाणी शेतकऱ्यांना देण्यास योग्य आहे काय, पाणी देता येईल काय.<br>• या जनसुनावणीला उपस्थितांची संख्या १७० हुनही कमी आहे याबाबत नोंद घ्यावी. | • जनसुनावणीच्या ३० दिवस आधी मराठी दैनिक वृत्तपत्र लोकमत व टाईम्स ऑफ इंडिया मध्ये जनसुनावणी बद्दल जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. तसेच प्रकल्पक्षेत्रातील ग्रामपंचायत येथे पत्राद्वारे कळविण्यात आले होते.<br>• या समितीच्या कार्यकक्ष मर्यादीत आहे व पर्यावरण संबंधित विषयावर उपस्थितांनी प्रश्न विचारावे. उपस्थितांचे प्रश्न प्रदूषण, पर्यावरणावर होणरा परिणाम यावर मर्यादीत असावे. | • तसेच ११/१२/२०२४ रोजी जनसुनावणी बद्दल गावांमध्ये दवंडी करण्यात आली. दवंडी दरम्यान प्रकल्पक्षेत्रांतील गावांमध्ये जनसुनावणी बद्दल माहिती देणारे बॅनर जागोजागी लावण्यात आले व लाऊडस्पिकर ने जनसुनावणी बद्दल नागरीकांना सूचना देण्यात आली. गावात करण्यात आलेल्या दवंडीची व्हीडीओग्राफी व फोटोग्राफी करण्यात आली व म.प्र.नि.मंडळाला सुपुर्त करण्यात आली.जनसुनावणीसाठी लोकप्रतिनिधी व स्थानिक ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष भेट देवून माहिती देण्यात आली. परंतू काही कारणास्तव ते उपस्थित राहू शकले नाही.<br>• १ टन स्टल उत्पादनाकरीता फक्त ३० किलो मॅगनीज वापरण्यात येते. मॅगनीज प्रक्रिया उद्योगाद्वारे फेरो एलोईस बनवले जातात. त्यासाठी मोठ्या प्रमाणात विजेचा वापर होतो व |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | उत्पादन खर्चाच्या ६० टक्के विजेचा खर्च असतो. मॅगनीज प्रक्रिया प्रकल्पाला फायदेशीर बनविण्यासाठी सबसिडी दरात विज उपलब्ध करून देण्याची विनंती सरकारला करण्यात आलेली आहे. ही विनंती मान्य झाल्यास मॅगनीज प्रक्रिया उद्योग या क्षेत्रात उभारता येईल. बॅटरी निर्माण उद्योगासाठी या खाणीतील मॅगनीज उपयोग नाही.<br>• मानसिंहदेव अभयारण्य प्रकल्पापासून ६.२९ कि.मी. अंतरावर आहे. वन्यजीव संवर्धनासाठीची योजना प्रधान मुख्य वन संरक्षक यांना प्रस्तुत करण्यात आला आहे व त्यांच्याकडून मान्यताप्राप्त आहे. या योजने अंतर्गत १.१९ कोटी रूपये वन विभागाला देण्यात आले आहे.<br>• हा प्रकल्प भुमिगत खाणीचा आहे व भुपृष्ठभागावर कोणतीही हाणी होणार नाही. प्रकल्पासाठी उपसा करण्यात येणारे पाणी सॅन्ड स्टोईंगसाठी वापरण्यात येईल व रिसायकल करण्यात येईल. पाण्याचा उपसा करण्यासाठी CGWA कडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले आहे. ९० केएलडी पाणी दैनंदीन वापरासाठी उपसा केले जाते व सांडपाणी प्रक्रियाद्वारे पुन्हा वापरले जाते. खाणीसाठी ४२ ते ४७ केएलडी पाणी उपसा केले जाते व सॅन्ड स्टोईंगसाठी वापरले जाते. खाण भरणीकरणासाठी रेती व बॉटम ॲशचा उपयोग करण्यात येईल. यामध्ये ६० टक्के बॉटम ॲश व ४० टक्के रेती वापरल्या जाईल. एनटीपीसी द्वारे बॉटम ॲश दिल्या जाते. ह पध्दत CIMFR द्वारे अभ्यासलेली आहे व मान्यताप्राप्त आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • प्रकल्पासाठी गरजेचे असलेले पाणी उपसा केले जाते. अधिकचे पाणी उपसा केले जात नाही.<br>• मनसर मॅगनीज भुमिगत खान येथे सध्या ३२३ सरळ भरतीतील कर्मचारी व कामगार कार्यरत आहेत. तसेच कंत्राटी पध्दतीमध्ये ४२७ कर्मचारी कामगार या वर्षात कार्यरत आहेत. प्रकल्पाच्या उत्पादन वृध्दि नंतर ३२४ अधिकचे कर्मचारी या प्रकल्पासाठी लागतील. यातील ५० ते ६० कर्मचारी थेट पध्दतीने भरती करण्यात येतील. तसेच उर्वरीत कंत्राटी पध्दतीने शैक्षणिक व तांत्रिक अर्हतेनुसार भरती करण्यात येतील. या उत्पादनवाढी दरम्यान यांत्रिक करणावर विशेष भर देण्यात येईल. |
| ४ | श्री.ओम सहारे, पाचगांव, खैरी बिजेवाडा, ता.रामटेक, जि.नागपूर यांनी प्रकल्पास आपली सहमती दर्शविली. | • उपस्थितांनी वाद करू नये व आपले प्रश्न प्रकल्पासंबंधित व पर्यावरणा संबंधित मर्यादित ठेवावे. | • प्रकल्प धारकांनी या मुद्दयाची नोंद घेतली व आपली सहमती दर्शविली. |
| ५. | श्री.बैजु प्रकाश खरे, सदस्य्य, ग्रामपंचायत, मनसर, ता.रामटके, जि.नागपूर यांनी प्रकल्पास आपली सहमती दर्शविली.<br>• प्रकल्पामुळे रोजगार मिळेल, पर्यावरणाची हानी होणार नाही.<br>• मॅगनीज चे ट्रान्सपोर्ट हायवे व रेल्वेने होईल व प्रदूषण होणार नाही.<br>• खाणीतुन उपसा केलेले पाणी खान भरनी करण्यासाठी हायड्रालिक सॅन्ड स्टोविंगद्वारे जमिनीत परत जाईल. | • मॉयल अधिकाऱ्यांनी पाणी वन्यजीव व वृक्ष लागवड बद्दल उपस्थित झालेले प्रश्नांचे उत्तर दयावे.<br>• खनन पध्दती बद्दल स्पष्टीकरण दयावे.<br>**सदस्या,** जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी यांनी प्रकल्प प्रवर्तकास अशा सूचना केल्या की, आतापर्यंत बरेच मुद्दे उपस्थित झालेले आहेत पण याच्यात आणखी काही मुद्द्याचं स्पष्टीकरण होणं जरूरी आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे Mining method जी mining method इथे वापरल्या जात आहे त्याचं पुर्णपणे व्यवस्थित हे regularise करून घेणं आवश्यक आहे. mining method बद्दल स्पष्टीकरण पुर्ण आलेले नाही. पहिली गोष्ट ही त्याच्यानंतर | • मॉयल लिमिटेड द्वारा मनसर भूमितगत खान येथे १२५००० हुन अधिक झाडे ४६ हेक्टर भागात लावण्यात आलेली आहेत. तसेच वन विभागाकडुन अधिकची जागा मिळाल्यास त्यावरही झाडे लागवड करण्यात येईल.<br>• मनसर मॅगनीज भुमिगत खान येथे ओवरहॅन्ड कट ॲन्ड फिल पध्दतीने भुमिगत खनन केल्या जाते. या पध्दतीत प्रत्येक स्टेपमध्ये ३ मिटरच्या जाडीची ओरबॉडी कमवार खनन केल्या जाते व खान भरनी करण्यासाठी हायड्रोलिक सॅन्ड स्टोवींगद्वारे बॉटम ॲश व रेतीचा उपयोग करण्यात येतो.<br>• मनसर मॅगनीज भुमिगत खान येथुन मॅगनीज खनीजाचे ६० टक्के वहन रेल्वेने व ४० टक्के |

| | | | |
|---|---|---|---|
| | | Transportation बद्दल मुद्दा उपस्थित झालेला नाही आहे. Presentation मध्ये काही ज्या आपल्याला गोष्टी आहेत त्या थोड्याशा आपण specialized करणे आवश्यक आहे. त्यात सर्व गोष्टी आपण याच्यामध्ये समाविष्ट करू. आपण आपल्या जे Minutes येथील त्यामध्ये यांच्यात मॉयलकडून घेण्यात यावा.<br>**समन्वयक,** जनसुनावणी समिती यांनी केलेल्या आव्हानावरून श्री.गोस्वामी, सामाजीक सेवा यांचे लेखी निवेदन प्राप्त झाले. त्यामध्ये त्यांनी ४ मुद्दे उपस्थित केले.<br>१. वाढीव उत्पादन क्षमतेमुळे मनसर येथील पर्यावरण व आरोग्यावरील परिणामावर आपण कोणत्या उपाययोजना करणार आहात.<br>२. या वाढीव उत्पादनामुळे होणाऱ्या भूगर्भातील बदलामुळे बांधकामावरील परिणामावरील उपाययोजना बाबत.<br>३. वाढीव उत्पादनामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी खोलवर जाईल.<br>• आमच्या क्षेत्रामध्ये गंधयुक्त व दूषित पाणी मिळेल यावरील उपाययोजनेबाबत आणि या वाढीव उत्पादनामुळे सामान्य नागरीकांचे आर्थीक व आरोग्य विषयक होणाऱ्या नुकसानीबाबत आपली उपाययोजना काय राहणार आहे. याबाबत आपले म्हणने येथे स्पष्टकरावे किंवा लेखी स्वरूपात देण्यात यावे, असे सांगितले. | ट्रकने वहन केल्या जाते. वहन करतांना मॅगनीज खनीजाला टारपोलीनने पुर्णत: झाकले जाते. जेणेकरून धुळीचे प्रदूषण होत नाही तसेच खाणीतील रस्त्यावर नियमित पाण्याचा छिडकांव करण्यात येतो व खाणी बाहेरील ट्रास्पोर्टेशन राष्ट्रीय महामार्गाच्या माध्यमाने केले जाते.<br>• प्रकल्प प्रवर्तक यांनी याची नोंद घेतली व सुधारीत अहवाल सादर करण्यात येईल, असे सांगितले.<br>• प्रकल्प प्रवर्तक यांनी आम्ही याची नोंद घेतली असून लेखी स्वरूपात सादर करू, असे सांगितले. |

**मा. समिती अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांनी समारोप प्रसंगी आपल्या अभिप्रायात अशा सूचना केल्या की:-**

१. पुर्ण presentation मध्ये बऱ्याचशा ज्या गोष्टी आहेत त्या थोड्या त्रुटीपुर्ण आहेत. त्या correct करणं consultant करून घेणं अपेक्षित आहे.

२. प्रकल्प प्रवर्तकाने जो Plan सादर केला तो फार मोगम प्लान झालेला आहे.

३. या प्रकल्पास्थळी असलेल्या सोसायटी आहे किंवा जी community करीता आपण काय करणार आहात हे स्पष्ट नाही.

४. प्रकल्प प्रवर्तक यांनी झाडं लावणार किंवा कॅम्प घेवू असे इथे सांगितले आहे. परंतू २०३२ पर्यंत वर्क करत असणार तर २०२३ पर्यंतचा प्रकल्प प्रवर्तक यांचा सीएसआर चा प्लान Parallly तयार असायला पाहीजे होता.

५. प्रकल्प प्रवर्तक २०३२ पर्यंत कुठल्या activity करणार आहात?

६. कुठल्या आरोग्याच्या कॅम्प कुठल्या आरोग्याच्या facility इथे नव्याने निर्माण करणार आहात?

७. कुठल्या शाळा व एज्युकेशन facility देणार आहात व नमुद केले की, एक शासकीय संस्था म्हणून आपण सामुदायीक विकास करणे अपेक्षित आहे. त्यामुळे या सर्व गोष्टीला समोर जाण्यापुर्वी सर्व योजना आपण नुतनीकरन करून घेणे अपेक्षित आहे व याबाबतचा तपशिल देण्यास सूचित केले.

८. प्रकल्प प्रवर्तक यांनी त्यांच्याकडे मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या जागेवर रेनवॉटर हर्व्हेस्टिंगचा नियोजन करणेबाबत सुचित केले.

व पुढे प्रकल्प प्रवर्तकास सुचित केले की, जर समजा एखादा शेतकऱ्याची किंवा कुठल्या लोकल माणसाची जर requirement असेल तर ती जर आपण as a agency म्हणून करत असतांना पुर्ण करू शकलो तरी ती आपल्यासाठी एक good gesture निर्माण करणारी activity आहे. As a ageny आपण फक्त म्हणजे तुम्ही वेगळे आहे इथली community वेगळी आहे असं accepted करू शकत नाही. जे काही आहे जे आपल्याला आपल्या सगळयांसाठीच करायचं आहे. आपल्या शास्वत विकासाठी करायचं आहे, हे आपण लक्षात घ्यायला पाहिजे एक आणखी थोडसं यांचा जो रोश घेतला की, इथले काही लोकल लोकं ज्या आपल्या वरिष्ठ कार्यालयात येतात तर त्यांना थोडं मानाची ची वागणुक मिळायला पाहिजे. Basicallcy बऱ्याच institution मध्ये Govt. institution मध्ये फक्त problem जे आहेत ते आपल्या योग्य न बोलल्यामुळे create होतात. माझी मॉयलच्या व्यवस्थापना एक विनंती आहे एक चांगला PRO याच्यामध्ये असेल तर तो तुमच्या आणि इथल्या लोकांमध्ये चांगला contact ठेवू शकते. तुम्ही बोलनं अपेक्षित आहे. तुम्ही फार वरिष्ठ लोकं आहात जे काही खूप काम असतील त्यामुळे आपण वेळही देवू शकणार नाही. पण इथली जी लोकल community आहे आणि त्यात तुम्ही याच्यामध्ये कुठला तरी चांगला दोहा असणं अपेक्षित आहे. ज्यामुळे आपल्या एखादया behaviour मध्ये कुठ तरी आपली image as a institution damage होणार नाही याची काळजी सुध्दा घेणं तुमच्या level ला अपेक्षित आहे. बस या दोन चार सूचना आहेत तेवढं आपल्याकडनं follow होणं अपेक्षित आहे. Govt organization असल्यामुळे as a district administration आमच्या अपेक्षा जास्त राहतील. समितीची कार्यकक्षा फार मर्यादीत आहेत जी pollution control आहे किंवा इतर गोष्टी आहेत. पर्यावरणावर होणारे effect आहे याच्यापलीकडे आम्ही जास्त कमीटीमध्ये नोंदघेवू शकत नाही. पण ज्या गोष्टी इथे जास्त मॅगनीज प्रोसेसिंग प्रकल्पाच्या बाबतीत तर निश्चित district administration कडनं किंवा मा.जिल्हाधिकारी महोदयांकडनं जे political funcitionally जिल्ह्यामध्ये आहे. त्यांच्या निश्चित निदर्शनास आणून दिल्या जाईल असे कळविले.

**समन्वयकः-**

आभार प्रदर्शनामध्ये उपस्थितांचे आभार मानुन व उपस्थितांनी पर्यावरण विषयक जे काही मुद्दे उपस्थित केले त्या मुद्द्यांची जशीच्या तशी नोंद घेवून व त्याचे छायाचित्रीकरन करून नमुद केले आहे असे सांगितले व लोकसुनावनीच्या इतीवृत्तांतामध्ये समाविष्ट करून पुढील योग्य त्या कार्यवाही करीता सदरचा अहवाल पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र

शासन हयांना आमच्या समिती कमिटी मार्फत मुख्यालयात पाठवून सादर करण्यात येईल व त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी साहेब यांच्या मान्यतेने लोकसुनावणी पुर्ण झाल्याचे घोषीत केले.

**(हेमा देशपांडे)**
सदस्या लोकसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, नागपुर

**(रा. उ. पाटील)**
समन्वयक लोकसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, नागपुर-१

**(अनुप खांडे)**
अध्यक्ष, लोकसुनावणी समिती
तथा अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर.